# बोंबला.. गेवराईत महसूलचे अधिकारीच वाळू माफियांचे खबरी?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
**आरंभ**
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २५१ ■ शुक्रवार दि.३० मे २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 251 ■ Friday Dt.30 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4



# कलेक्टर महोदय, महसूल विभागातल्या अधिकाऱ्यांना थोडी तरी शरम बाळगा म्हणत टीप देणाऱ्यांचे कौतुक करा आणि माफियांचे कंबरडे मोडा?

## रात्री-अपरात्री सर्वसामान्यांनी टीप देताच लाचखोर अधिकारी-कर्मचारी माफियांना सांगतात खबर देणाऱ्याचे नाव? यातून घडतात मारामारीच्या घटना; होतो सर्वसामान्यांवर अन्याय!

## महसूल प्रशासनाच्या लाचखोरीमुळे गुन्हेगारी वाढत चालली; जिल्हाधिकाऱ्यांनी गंभीर दखल घेऊन माफियांचे कंबरडे मोडण्याचे सक्त आदेश द्यावेत?

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यात गोदाकाठ असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाळू माफिये वाळुची तस्करी करतात हे सर्वश्रुत आहे. माफियांविरोधात पोलीस अधिक्षकांनी मोहीम उघडलेली असताना महसूलचे अधिकारी, कर्मचारी मात्र माफियांचे हस्तक झाल्याचे दिसून येत आहे. गोदावरी नदी पात्रातून वाळुचा उपसा सुरु असल्यास काही गावकरी याची गोपनीय माहिती तलाठी अथवा तहसीलदार, मंडळ अधिकारी यांना देतात. मात्र हेच महसूलचे अधिकारी आलेल्या गोपनीय माहितीच्या आधारे कारवाई न करता ती माहिती संबंधित माफियांना देतात. त्यामुळे गेवराई तालुक्यात सातत्याने वाळूचोर, माफिया व सर्वसामान्यात वाद होतो. माफिये पैशाच्या जोरावर प्रशासनाला टीप देणाऱ्या लोकांना मारहाणही करतात आणि इथेच मग गँगवॉर, रक्तरंजीत घटना घडतात. जिल्हाधिकाऱ्यांनी गेवराई तालुक्यातील महसूल



विभागातल्या अधिकाऱ्यांना थोडी तरी शरम बाळगा म्हणत टीप देणाऱ्यांचे कौतुक करा आणि माफियांचे कंबरडे मोडा असे सक्त आदेश द्यावेत.

गेल्या कित्येक वर्षांपासून गेवराई तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर वाळुची तस्करी केली जाते. कमी श्रमामध्ये जास्तीत जास्त पैसा मिळवण्याच्या उद्देशाने अनेकजण या धंद्यामध्ये उतरले आहेत. महसूल आणि पोलीस प्रशासनाला हप्ता देत सर्रास शेतकऱ्यांच्या शेतातूनही वाळुचे टिप्पर, ट्रॅक्टर नेले जातात. गेल्या काही दिवसांच्या कालखंडामध्ये अनेक शेतकरी, सर्वसामान्य गोदापात्रातून कोणी जर वाळूउपसा करत असतील तर त्याची माहिती तलाठी, मंडळ अधिकारी, तहसीलदार अथवा अन्य अधिकाऱ्यांना भ्रमणध्वनीवरून देतात. त्या माहितीच्या आधारे कारवाई करण्यापेक्षा हे लाचखोर आलेली माहिती संबंधित माफियांना देतात. एवढेच नव्हे तर कुठल्या नंबरवरून फोन आला तो नंबरही देऊन टाकतात त्यामुळे माफिये चिडून वाळुची टिप देणाऱ्या लोकांना

पान २ वर



## प्रकाश आंबेडकर नगर इमामपूर रोड येथील बालविवाह थांबवला

बीड । प्रतिनिधी

आज दुपारी एक ते दोनच्या दरम्यान प्रकाश आंबेडकर नगर इमामपूर रोड बीड या ठिकाणी बालविवाह होणार असल्याची माहिती सामाजिक संस्था राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीड यांना मिळाली. त्यानुसार पोलीस व एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी बीड यांना सदरील बालविवाह होणार असल्याची माहिती दिली पेठ बीड पोलीस, सामाजिक कार्यकर्ते त्या ठिकाणी पोहोचले. त्यावेळी बाल विवाहाची तयारी झालेली होती. डॉल्बी लावून परण्या निघालेला





होता त्या ठिकाणी पेठ बीडचे एन.ए. माने, तत्वशिल कांबळे अधिकार मित्र जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड व पेठ बीड पोलीस स्टेशनचे इतर कर्मचारी ठिकाणी उपस्थित होते मुलीचे व मुलाचे दोघांचेही वय कमी होते. वयाची पडताळणी केल्यानंतर मुलीचे वय १४ वर्षे व मुलाचे वय सतरा वर्ष आहे असे निदर्शनास आले. त्या दोघांचे आई-वडील व इतर नातेवाईक या सर्वांना बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ या कायद्याविषयी माहिती दिली. मुलाचे व मुलींचे शिक्षण पूर्ण करण्याविषयी मार्गदर्शन केले व सदरील बालविवाह थांबवण्यास सांगितले. मुलाचे व मुलीचे आई-वडिलांनी बाल विवाह करणार नाहीत असे सांगितले सर्व नातेवाईक यांनी समजून सांगितले सदर मुलीला व मुलाला बालकल्याण समिती बीड यांच्यासमोर सादर करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## लोकशाहीला काळा दिवस

### आहेर वडगांवमध्ये माहिती अधिकार कार्यकर्त्याच्या भावावर कट रचून जीवघेणा हल्ला

बीड । प्रतिनिधी

आहेर वडगांव (ता. बीड) येथे एक अत्यंत गंभीर व संतापजनक घटना घडली आहे. माहिती अधिकार कार्यकर्त्याच्या लहान भावावर गावातील विद्यमान सरपंच, उपसरपंच आणि त्यांच्या समर्थकांनी कट रचून योजनाबद्धपणे हल्ला केला. या हल्ल्यात पीडित तरुण गंभीर जखमी झाला असून सध्या त्याच्यावर बीड जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



हल्लेखोरांनी ही मारहाण कोणत्याही तात्कालिक कारणाने केलेली नसून, ही एक पूर्वनियोजित आणि सूडाने केलेली हिंसा आहे, असे माहिती अधिकार कार्यकर्त्याचे स्पष्ट म्हणणे आहे. ते गेल्या काही महिन्यांपासून ग्रामपंचायतीत माहिती अधिकारांतर्गत अर्ज करत असून, या अर्जांमुळे अनेक गैरव्यवहार उघड होण्याची भीती सरपंच आणि उपसरपंच यांना होती. त्यामुळेच त्यांनी कट रचून त्यांच्या भावावर हल्ला घडवून आणला.

**पोलीस स्थानकातही दबावाचे वातावरण**

घटनेनंतर पीडिताच्या भावाने संबंधित पोलीस

पान २ वर

## अवैधरित्या गुटखा बाळगुन चोरटी विक्री करणाऱ्यावर माजलगांव शहर पोलीसांचा छापा

माजलगाव । प्रतिनिधी

दिनांक २९/०५/२०२५ रोजी गोपनिय माहीतीच्या आधारे माजलगांव शहर पोलीसांनी माजलगांव शहरातील पॉवर हाऊस रोड लगत असलेल्या दत्त किराणा दुकानावर १९.२० वाजता छापा मारुन नमुद दुकानातुन महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गोवा १०००, व डायरेक्टर पान मसाला नावाचा ६४,६००/- रुपये किमतीचा गुटखा जप्त करुन सदर गुटखा बाळगुन चोरटी विक्री करणारा भारत उत्तमराव होके वय ३० वर्षे



रा. पाटील गल्ली माजलगांव ता. माजलगांव जि.बीड तसेच इतर एका विरुध्द गु.र.नं. २०२/२०२५ कलम १२३,२२३,२७४,२७५,३(५) भारतीय न्याय संहीता प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोलीस उपनिरीक्षक, केरबा माकणे, संदिप राठोड, पोहेकॉ माधव तोटेवाड, पोलीस अंमलदार सुनिल गवळी यांनी केली.

## केज तालुक्यात तलाठ्यांच्या मनमानी कारभाराच्या विरोधात तहसीलदारांना निवेदन

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील सर्व तलाठ्यांनी आपापल्या सज्जावर उपस्थित राहावे असे निवेदन केज तालुका शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या वतीने तहसीलदार साहेब यांना देण्यात आले. केज तालुक्यातील एक ही तलाठी सज्जवर उपस्थित राहत नाहीत. ते तालुक्याच्या ठिकाणी बसून कारभार हाकतात शासनाने दिलेले सज्जवरील शासकीय कार्यालय धूळखात पडलेले आहे. काही ठिकाणी तलाठी



कार्यालयात जुगार खेळला जातो, काही ठिकाणी तलाठी कार्यालय जनावरांचे गोठे बनले आहेत.

शासनाने लाखो रुपये खर्च करून जनतेच्या सोयीसाठी इमारती उभ्या केल्या परंतु त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत नाही. पीक विमा, अनुदान अशा अनेक योजना साठी तलाठी कार्यालयातील कागदपत्राची आवश्यकता असते पण सज्जवरिल तलाठी कार्यालयात तलाठी हजर नसतात. आठ दिवसात तलाठी आपापल्या सज्जावर उपस्थित न राहिल्यास शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने अमरण उपोषण करण्यात येईल. असा इशारा केज तालुका शिवसेनेच्या वतीने, तालुका प्रमुख अशोक

पान २ वर

# पालकमंत्री, खासदार, आमदार, जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी यांनी या रस्त्यावर मोटर सायकल चालवावी

## डॉ. गणेश ढवळे यांनी आपल्या अंतराळवीरांसह येथे उतरावे – एस.एम.युसूफ़


बीड । प्रतिनिधी

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बलभीम चौक ते माळीवेस चौक पर्यंत रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झाली आहे. पावला पावलावर खड्डे आणि त्यात साचलेले पावसाचे पाणी यामुळे पादचाऱ्यांसह सर्वच वाहन चालकांच्या नाकी नऊ येत आहे. याचे कुठलेही सोयर सुतक शासन–प्रशासनकर्त्यांना नसल्याने गेल्या अनेक वर्षांपासून जनतेला मोठ्या प्रमाणात हाल अपेष्टा सोसाव्या लागत आहे. या हाल अपेष्टा अनुभवण्यासाठी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, खासदार बजरंग सोनवणे, आमदार संदीप क्षीरसागर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, बीड नगर परिषद च्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी या रस्त्यांवर येवून प्रत्यक्षात मोटरसायकली घेऊन फेरफटका मारत याचा अनुभव घ्यावा तसेच धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनीही आपल्या अंतराळवीरांसह या रस्त्यांवर येऊन आंदोलन करावे असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम. युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.



याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, तत्कालीन जिल्हाधिकारी सुनील केंद्रेकर यांनी त्यांच्या कार्यकाळात या रस्त्यांवर मास्टर प्लॅनची अंमलबजावणी केली होती. तेव्हा या रस्त्याच्या रुंदीकरणासह डांबरीकरण करण्यात आले होते. त्याला आता अनेक वर्षे झाली आहेत. तेव्हापासून आतापर्यंत या रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजविण्याची तसदी सुद्धा शासन–प्रशासनाकडून घेण्यात आली नाही. यामुळे हा रस्ता आता अत्यंत बकाल अवस्थेत गेला आहे. पावला पावलावर खड्डेच खड्डे पडल्याने पाय ठेवण्यासाठी सुद्धा चांगली जागा मिळत नाही. एकीकडे पादचाऱ्यांचे असे हाल होत असताना दुसरीकडे वाहन चालकांनाही मोठा त्रास सहन करत येथून ये–जा करावी लागत आहे. दुचाकी चालवणाऱ्यांच्या मानेचे व पाठीचे मणके खिळखिळे होत आहे. सध्या पावसाळा सुरू झाला असून गेल्या काही दिवसांपासून दररोज पडणाऱ्या पावसामुळे येथील खड्ड्यांत मोठ्या प्रमाणात पाणी साचून राहत आहे. दुचाकी चालविताना त्यात चाक आदळले की उडणारे पाणी रस्त्यावरून चालणाऱ्यांच्या अंगावर उडत आहे. यामुळे वेळप्रसंगी तक्रारींच्या घटनाही घडत आहेत. मात्र याचे कुठेही सोयरसुतक शासन–प्रशासनकर्त्यांना नसल्याने जनतेच्या त्रासात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. जनतेचा त्रास कमी व्हावा म्हणून जिल्ह्याचे पालकमंत्री, खासदार, आमदार, जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी यांनी जातीने येथे येऊन स्वतः प्रत्यक्ष मोटरसायकली चालवून येथील त्रासाचा अनुभव घ्यावा आणि हा रस्ता सिमेंट कॉंक्रीटने लवकरात लवकर चांगला तयार करावा.

तसेच शासन–प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनीही आपल्या अंतराळवीरांसह या रस्त्यावर येऊन एखादे चांगले मोठे आंदोलन करावे असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.



# शेतकरी व शेत मजूरांच्या मागण्यासाठी केज तहसिलदार कार्यालयावर निदर्शन मोर्चा

केज । प्रतिनिधी

दि. ३० में २०२५, शुक्रवारी सकाळी ११:०० वाजता केज तहसील कार्यालय समोर मोर्चा करण्यात आला. यामध्ये संघटनेच्या वतीने प्रमुख मागण्यासाठी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. यामध्ये गायरान धारक शेतकऱ्यांना मालकी हक्क (७/१२) देण्यात यावा. त्यात कोर्टाची कसलीच अट घालण्याची आड घेवु नये. कोर्टाने शासनाचे याबद्दल काय धोरण आहे, निकष आहे, फक्त हेच विचारले आहे. निवडणुकापूर्वी त्यावेळचे महसूल मंत्री यांनी विधानसभेत गायरान जमीनधारकांना आम्ही ७/१२ देवु आणि धोरण तयार करू अशी घोषणा केली होती.

जो पर्यंत गायरानधारकांना ७/१२ मिळत नाही तो पर्यंत कर्जाची, विम्याची आणि शेतीसाठी शासनाकडुन मिळणाऱ्या अनुदान मदतीचा लाभ देण्यात यावेत. सर्व शेतीमालाला उत्पन्न खर्चाच्या दीडपट किमान भाव (उ२+५०%) देण्यात यावे. उत्तम गुणवत्तेची बी–बियाणे, खत यांची शासनानी घोषीत केलेली माफक दराप्रमाणे वेळेवर सतत पुरवठा उपलब्ध करून देणं, यांची काळाबाजारी थांबवणे व भेसळयुक्त बी–बियाणे खताची पुरवठा रोखणे; काव्ळाबाजारी व भेसळकरणारी दोषी व्यक्तींना शिक्षा देणे आदि बाबतीत शासन प्रशासनानी योग्य वेळी पावले उचलावी. अशा काही मागण्यांसह हा मोर्चा काढण्यात आला.

तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या आश्वासनानंतर मोर्चाची सांगता झाली. यावेळी कॉम्रेड अनिल त्यागी, गोपीनाथ कांबळे, एच व्ही दिवाकर, अभिमान गायकवाड, तसेच असंख्य कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत हा मोर्चा पार पडला.

# भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी बीड शहरात रिपाइंची भारत झिंदाबाद तिरंगा रॅली

## पप्पु कागदे यांच्या नेतृत्वाखाली रॅलीमध्ये हजारो कार्यकर्ते सामील; राष्ट्रगीताने झाली भारत झिंदाबाद तिरंगा रॅलीची सांगता

बीड । प्रतिनिधी

जम्मु काशमीर मधील पहलगाम येथे निरापराध भारतीय पर्यटकावर दहशतवाऱ्यांनी भ्याड हल्ला करून अठावीस भारतीयांची हत्या केली होती. दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारतीय सैनिकांनी सिन्दुर ऑपरेशन यशस्वी करून पाकव्याप्त काश्मीरमधील दहशत वाद्यांची ठिकाणे उध्दवस्त करुन शंभर पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले. भारतीय सैनिकांनी अतुलनिय शौर्य दाखवून दहशतवाद्यांना धडा शिकविण्यासाठी सिन्दुर ऑपरेशन यशस्वी केल्याबद्दल रिपब्लिकन पक्षाच्या वतीने भारतीय सैनिकांच्या अभुतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी व शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी केंद्रिय मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार शुक्रवार दि.३० मे रोजी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून साहीत्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळा मार्गे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत भारत झिंदाबाद तिरंगा मोटार सायकल रॅली काढण्यात आली.

या भारत झिंदाबाद रॅलीची सांगता राष्ट्र गीताने झाली. भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी व शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या भारत झिंदाबाद तिरंगा रॅलीत महीला, रिपाइं पदाधिकारी व कार्यकर्ते हजारोच्या संखेने सामील झाले होते.

बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यापासून काढण्यात आलेल्या भारत झिंदाबाद तिरंगा रॅलीत रिपाइं जेष्ट नेते कांतीकुमार जैन, राजू जोगदंड, मझरखान, अशोक साळवे, किसन तांगडे, किशोर कांडेकर, अविनाश जावळे, दीपक कांबळे, महादेव उजगरे, अरुण भालेराव, धोंडीराम सिरसट, लक्ष्मण सिरसट, अरुण निकाळजे, दशरथ सोनवणे, दिपक कांबळे, गोवर्धन वाघमारे, शाहू डोळस, दशरथ शिंदे, रवी जोगदंड, महेश आठवले, प्रमोद दासूद, संदिपान डोंगरे, दिलीप बनसोडे, गौतम बचुटे, अड. सुरेश वडमारे, मायाताई मिसळे, सलमाभाभी, संगीता जाधव, माया वाघमारे, राणी गायकवाड, शोभा गलांडे, राहुल सरवदे, रमेश निशिगंध, निलेश ढोबळे, विलास वाघमारे, मिलिंद तरकसे, आनंद ओगले, बाबा देशमाने, बाळासाहेब ओव्हाळ, अविनाश जोगदंड, विलास जोगदंड, प्रभाकर चांदणे, सुभाष तांगडे, भैय्या मस्के, शाम वीर, आप्पा मिसळे, प्रा.बाळासाहेब गव्हाणे, अक्षय कोकाटे, नागेश दुबळे, चिंटू वडमारे, गौरी वडमारे, अजिंक्य वडमारे, संजय कागदे, प्रभाकर जोगदंड, सतीश शिनगारे, महेंद्र वडमारे, मनोज बोराडे, भैय्या



साळवे, संजय हनवते, गौतम कांबळे, सोनू वडमारे, धम्मा पारवेकर, महेश कागदे, अविनाश अवघड, प्रशांत मोरे, नागेश शिंदे, देवानंद वाघमारे, रतन वाघमारे, भाऊसाहेब दळवी, भाऊसाहेब कांबळे, किरण खंडागळे, नवनाथ डोळस, भास्कर जावळे, राहुल कांबळे, नामदेव वाघमारे,रामेश्वर खळगे, सिध्दार्थ वाघमारे, देवानंद वाघमारे, विशाल पवार, दयानंद उबाळे, फुलचंद लुचारे, बंडू ठोंबरे, भीमराव घोडेराव यांच्यासह हजारो रिपाइं कार्यकर्ते भारत झिंदाबाद तिरंगा रॅलीत सहभागी झाले होते.



पान १ वरून...

### कलेक्टर महोदय, महसूल विभागातल्या अधिकाऱ्यांना थोडी..

मारहाण करतात. त्यामुळे दोन गट निर्माण होऊन कधी कधी तुंबळ मारामारी आणि यातून रक्तरंजीत भांडणे होत मुडदेही पडतात.

एकूणच केवळ महसूल प्रशासनाच्या लाचखोरीमुळे गुन्हेगारी वाढत चाललीय आणि सर्वसामान्यांवर अन्याय होत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी याची गंभीर दखल घ्यावी, गेल्या आठ दिवसांच्या कालखंडात गेवराई तालुक्यात रात्री–अपरात्री काहींनी तहसीलदारापासून तलाठी मंडळ अधिकाऱ्यांपर्यंत माहिती दिल्या. मात्र ज्यांनी माहिती दिली त्यांचे नाव या लाचखोरांनी वाळू माफियांना सांगितले. असे प्रकार उघडकीस आले आहे.

### आहेर वडगांवमध्ये माहिती अधिकार...

ठाण्यात तक्रार दाखल केली. मात्र त्यानंतर सरपंच, उपसरपंच आणि त्यांचे समर्थक सतत पोलीस ठाण्यात फेऱ्या मारत असून दबाव टाकण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे तपास निष्पक्ष राहणार की नाही, याविषयी गंभीर शंका व्यक्त होत आहे.

**कुटुंबावर दबाव आणण्याचा प्रयत्न**

ही घटना घडल्यानंतर फक्त मारहाण करून थांबले नाही, तर पीडिताचे कुटुंबही सतत मानसिक दबावाखाली ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे. ग्रामपंचायतमधील भ्रष्टाचार उघड करू नये म्हणून ही संपूर्ण यंत्रणा कार्यकर्त्यांच्या कुटुंबाविरुद्ध राबवली जात आहे.

**माहिती अधिकार अर्ज केल्यामुळेच सूडाने हल्ला**

पीडिताचा मोठा भाऊ गावातील ग्रामपंचायतीत सातत्याने माहिती अधिकारांतर्गत अर्ज करतो. याच कारणावरून सरपंच आणि उपसरपंच यांनी द्वेष ठेवून त्यांच्या भावावर हा हल्ला घडवून आणल्याचे पीडिताचे म्हणणे आहे.

**सरपंच व उपसरपंच यांनीच कट रचून टोळीने हल्ला केला**

ही जी टोळी आहे ती सरपंच आणि उपसरपंच यांनीच कट रचून गोळा केली असून, केवळ हल्लाच नव्हे तर कुटुंबावर दबाव टाकून ते आपल्या भ्रष्ट कारभारावर पडदा टाकण्याचा प्रयत्न करत आहेत.

### केज तालुक्यात तलाठ्यांच्या मनमानी

जाधव यांनी दिला आहे.

यावेळी उपजिल्हा प्रमुख दीपक बप्पा मोराले, युवासेना तालुका प्रमुख किशोर घुले, शहर प्रमुख तात्या रोडे, तालुका सचिव सखाराम वयबसे, जिल्हा संघटक दिलीप जाधव, उपशहर प्रमुख पप्पू ढगे, महादेव घोळवे, प्रभाकर शिंदे, नारायण तांदळे, व शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक उपस्थित होते.

# पाणीदार नेते : आदरणीय श्री. अमरसिंह पंडित साहेब

बीड जिल्ह्यातील गेवराई तालुका म्हणजे शेतीप्रधान परंतु अनेक अडचणींनी ग्रासलेला भाग व या अडचणींना मात देणारे एक नाव या भागात गेल्या काही वर्षात विशेष उठून दिसतं ते म्हणजे गेवराई तालुक्याचे माजी आमदार व जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन आदरणीय श्री.अमरसिंह पंडित साहेब. पाणी, शेती, समाजकारण, आणि राजकारण या सगळ्या क्षेत्रात सक्रिय राहून त्यांनी समाजासाठी झटण्याचा आदर्श घालून दिला आहे. विशेष म्हणजे गेवराई तालुक्यातील श्री.अमरसिंह पंडित साहेब हे नाव आता पाण्यासाठी झगडणाऱ्या नेतृत्वाचं प्रतीक बनलं आहे. गेल्या काही दशकात गेवराई तालुक्यात दुष्काळ हे मोठ संकट होतं. दुष्काळाच्या झळा सोसत असलेल्या या भागात आदरणीय साहेबांनी पाण्याचे व्यवस्थापन आणि विकास घडवून आणत पाणीदार नेता म्हणून एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

साहेबांनी प्रकल्प जलशारदा व जलयुक्त शिवार योजने अंतर्गत गावोगावी बंधारे, खोदकाम, शेततळी, गाळ काढणे अशी कामे उभी केली. मा.श्री.अमरसिंह पंडित साहेब यांना समजलं होतं की शेती, आरोग्य शिक्षण या सगळ्यांच्या मुळाशी पाणी आहे. त्यांनी जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य दिलं. याचं सद्यस्थितीतील जिवंत उदाहरण म्हणजे सिंदफणा नदी पात्रात नऊ ठिकाणी नाथापुर, खुंड्रस, दगडगाव, टाकळगाव, इटकुर, अंकुटा, नामलगाव येथे बंधारे व्हावेत यासाठी असलेली त्यांची धडपड व प्रयत्न. साहेबांनी या प्रकल्पाचा वेळोवेळी शासन दरबारी पाठपुरावा करून शासनाची मंजुरी मिळवली.

आज गेवराई तालुक्यात श्रध्देय अमरसिंह पंडित साहेबांच्या पुढाकाराने उभारलेले सुमारे २५ लघु बंधारे हे शेतीला वर्षभर पाणी देतात. या बंधार्यांनी केवळ पाणी साठवून ठेवलं नाही तर भूजल पातळी वाढवली. विहिरींना पुन्हा जन्म दिला आणि शेतकऱ्यांना खरीपासोबत रब्बी हंगामातही पीक घेण्यास सक्षम केलं. आज गावात पाणी कमी असतानाही अनेक विहिरींना पाणी आहे याचे श्रेय त्यांच्याच कामाला जातं.

साहेबांचा दृष्टिकोन केवळ तांत्रिक नसून तो मानवी आहे. त्यामुळे त्यांचे नेतृत्व अधिक सशक्त आणि समावेशक ठरते. बंधाऱ्यांमुळे पाणी साचलं आणि पाण्यामुळे शेती फुलली. आदरणीय साहेब हे केवळ सामाजिक कार्यकर्ते नाहीत तर ते एक असा पाणीदार नेता आहेत ज्यांनी पाण्याच्या प्रत्येक थेंबाला विकासाचं रूप दिलं. गेवराई तालुक्याला दुष्काळाच्या छायेतून हिरवळीच्या दिशेने घेऊन जाणाऱ्या या नेत्याचे योगदान अनुकरणीय आहे.

आदरणीय अमरसिंह पंडित साहेबांनी शाश्वत शेतीच्या दिशेने लोकांचे लक्ष वेधून घेतलं. त्यांनी २०२३ या सालात ऊस विकास परिषद, जागर सेंद्रिय शेतीचा, बळीराजाच्या प्रश्नासाठी संघर्ष, मोसंबी विकास परिषद या उपक्रमांच्या माध्यमांतून शेतकरी बांधवांना प्रोत्साहित केले. त्यामुळे तालुक्यातील बरेच शेतकरी हे फळ लागवडीकडे वळले. यामुळे तालुक्यामध्ये बऱ्याच प्रमाणात मोसंबी लागवड झाली. तसेच जय भवानी सहकारी साखर कारखाना हा प्रभावीपणे चालवत वाढवलेली ऊस लागवड.

त्याचं जिवंत उदाहरण म्हणजे गेवराई तालुक्यातील असलेलं माझं गाव शिरसमार्ग



या गावात पूर्वी उन्हाळ्यामध्ये पाणी प्रश्न बिकट होता. सिंदफणा नदी गावातून वाहत असली तरी पाण्याची अडवणूक नसल्यामुळे नदीचं पाणी थेट वाहून जायचं परंतु आदरणीय अमरसिंह पंडित साहेब यांच्या पुढाकाराने या नदीवर बांधलेला बंधारा हे गावाच्या परिवर्तनाचं मुख्य कारण ठरलं. साहेबांनी सिंदफणा नदीच्या प्रवाहावर एक स्थायी बंधारा उभारण्याचे स्वप्न पाहिलं आणि ते प्रत्यक्षात उतरवलं. या बंधाऱ्यामुळे नदीचे पाणी अडवले गेले. भूजल पातळी वाढली आणि शिरसमार्ग व पंचक्रोशीतील विहिरींमध्ये बारमाही पाणी उपलब्ध होऊ लागलं. यामुळे गावातील पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात कमी झाली. पाण्याच्या उपलब्धतेमुळे शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांच्या ऐवजी मोसंबी लागवडीकडे वळण्यास सुरुवात केली. पूर्वी कर्जबाजारी असलेले अनेक शेतकरी आता मोसंबीच्या उत्पन्नातून स्वतंत्र आर्थिक निर्णय घेऊ लागले यामुळे गावची व परिसरातील नागरिकांची आर्थिक परिस्थिती झपाट्याने बदलली. त्यांच्या जीवनशैलीत स्पष्ट बदल दिसून येतो.पक्की घरी, शिक्षणावर खर्च, शेतीसाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर आणि सण समारंभामधील सहभाग वाढलेला आहे. याचं श्रेय संपूर्णतः आदरणीय श्री अमरसिंह पंडित साहेब यांना जातं. साहेबांचं नेतृत्व म्हणजे विकासासाठी समर्पण आणि दूरदृष्टी याचं सुंदर मिश्रण त्यांनी केवळ बंधारा उभारला नाही, तर त्या पाण्याचा शाश्वत वापर करून गावाचं अर्थचक्र बदलून टाकलं. त्यामुळे शिरसमार्ग हे गाव आज नदीकाठचं समृद्ध गाव म्हणून ओळखलं जातं.

साहेबांचे कार्य हे सिद्ध करतं की योग्य नियोजन आणि सकारात्मक नेतृत्व यामुळे एखादं गाव आत्मनिर्भर आणि समृद्ध होऊ शकतं. सिंदफणा नदीवरील बंधारा हा केवळ एक जलसाठा नाही तर परिवर्तनाचे प्रतीक आहे आणि मा.श्री अमरसिंह पंडित साहेब हे त्या परिवर्तनाचे शिल्पकार. साहेब आणखी सिंदफणा नदी पात्रात नऊ बंधारे व्हावेत यासाठी प्रयत्नशील आहेत आणि हे बंधारे पूर्ण झाल्या नंतर सिरसमार्ग प्रमाणेच त्या बंधार्याच्या काठची गावे ही देखील आणखी समृद्ध होतील.

फक्त शेतीपूरतेच मर्यादित न राहता साहेबांनी त्यांचे कार्य समाजाच्या प्रत्येक थरापर्यंत पोहोचवले आहे. त्यांनी तालुक्यातच युवा पिढीला चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी सुरू केलेल्या शिक्षण संस्था. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शाळा, विद्यालयांमध्ये वेळोवेळी राबवलेले विविध उपक्रम. सामाजिक जीवनात जनतेला मदतीच्या हेतूने शारदा प्रतिष्ठानच्या मार्फत आयोजित केलेले सामायिक विवाह सोहळे, युवकांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, वृद्धांसाठी आरोग्य तपासणी शिबिरे, अपंगांसाठी कृत्रिम हाथ, पाय अवयव वाटप आयोजित केलेले आहेत. या माध्यमातुन साहेब सतत जनकल्याणकारी कार्य करत आहेत.

आदरणीय अमरसिंह पंडित साहेबांनी राजकारणात प्रवेश हा केवळ पदासाठी नव्हे, तर लोकांच्या समस्यांना थेट प्रशासनापर्यंत पोहोचविण्यासाठी केला. लोककल्याणकारी कार्य करण्याचा वारसा साहेबांनी आदरणीय दादांकडून घेतं पंचायत समिती, जिल्हा परिषद, विधानसभा यांमध्ये नेतृत्व करत तालुक्यांतील नागरिकांचे प्रश्न सोडवले व आजतागायत सोडवत आहेत. पारदर्शक कामकाज निधीचा योग्य वापर आणि लोकांचा सहभाग यावर त्यांनी नेहमी भर दिला त्यांचं नेतृत्व हे विकासाभिमुख आणि लोककेंद्रीत आहे.

आदरणीय श्री.अमरसिंह पंडित साहेब हे केवळ एक नाव नाही तर एक चळवळ आहे पाण्याच्या थेंबापासून ते लोकांच्या आत्मविश्वासापर्यंत सगळं जपणारी. गेवराई तालुक्याला जिथं विकासाची गरज आहे तिथं आदरणीय अमरसिंह पंडित साहेब व शिवछत्र परिवार तालुक्यासाठी खरी आशा आहे. साहेबांच्या जनकल्याणकारी कार्याविषयी बोलण्यासारखे, लिहण्यासारखे आणखी भरपूर आहे. त्यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने मी माझ्या मनातील त्यांच्या विषयी असलेल्या आदरयुक्त भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. आदरणीय साहेबांना जन्मदिनाच्या लक्ष लक्ष शुभेच्छा.



प्रा.अजय पांडुरंग रत्नपारखे

उच्च माध्यमिक विद्यालय पाचेगाव

# अहिल्यादेवी होळकर म्हणजे धैर्य, शौर्य व औदार्याचे मूर्तिमंत स्वरूप

## ना. पंकजाताई मुंडेंच्या उपस्थितीत पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त कार्यक्रम

जबलपूर । प्रतिनिधी

जीवनामध्ये कितीही कठीण परिस्थिती आणि संघर्ष आला तरीही त्यावर मात करून जनहिताची असंख्य कार्य करणारे महापुरुष हे आपले आदर्श आहेत. धर्मकार्य, संस्कृतीसंरक्षण, निकोप राजसत्ता आणि शौर्य गाजवणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या प्रत्येकासाठी प्रेरणास्थान आहेत. आपल्या राजकीय वाटचालीतही त्यांचाच आदर्श घेऊन आपण पुढे जात आहोत. धैर्य, शौर्य व औदार्य याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्राच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी मध्यप्रदेश येथे आयोजित पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर जयंती समारोहामध्ये केले.



लोकमाता पुण्यश्लोक राणी अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त मध्यप्रदेशातील राणीतल (जबलपूर) येथील भाजप कार्यालयात ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. स्थानिक भाजप कार्यकर्त्यांना संबोधित करताना ना. पंकजाताईंनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याला उजाळा देत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. खासदार आशिष दुबे, महानगर जिल्हा अध्यक्ष रत्नेश कुमार, ग्रामीण जिल्हा अध्यक्ष राजकुमार पटेल, भाजप मध्य प्रदेश कोषाध्यक्ष अखिलेश जैन आदींसह पदाधिकारी याप्रसंगी उपस्थित होते.

**उत्कृष्ट भाषणाला उपस्थितांची दाद**

मध्य प्रदेशातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अतिशय उत्साहात पंकजाताई मुंडे यांचे जोरदार स्वागत केले. त्यांच्या भाषणादरम्यानही प्रचंड प्रतिसाद देत टाळ्यांच्या कडकडाटासह उपस्थितांनी त्यांच्या वक्तृत्वाला दाद दिल्याचे दिसुन आले.

यावेळी बोलतांना ना.पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या संपूर्ण जीवनचरित्राचा विचार केला तर त्या महाराणी तर होत्याच मात्र आपल्या शौर्याने त्या राजाही बनल्या. केवळ राजसत्ता नव्हे तर संपूर्ण भारतभरात सनातन धर्म, संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी त्यांचे कार्य हे अधोरेखित होते. आपल्या जीवनात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा आदर्श घेऊ आपण वाटचाल करीत आहोत. अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनचरित्रातून संघर्ष आणि त्या संघर्षावर शौर्याने केलेली मात हा एक मोठा सिद्धांतच शिकायला मिळतो. केवळ राजसत्ता नाही तर एक स्त्री म्हणून ममत्वभावाने त्यांनी प्रजेवर केलेले प्रेम आणि सर्वांनाच आनंददायी राजसत्ता याचा अनुभव त्यांनी दिला. आपल्या धर्मातील अनिष्ट प्रथांना बाजूला सारत आपल्या सनातन संस्कृतीचे महत्त्व ओळखून त्यांनी देशभर अनेक मंदिरांचा जिर्णोद्धार व आपली आध्यात्मिक परंपरा पुढे घेऊन जाण्याचे काम केलेले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर म्हणजे शौर्य, धैर्य आणि औदार्य याचे मूर्तीमंत स्वरूप असून त्यांचा आदर्श पुढे घेऊन वाटचाल केल्यास जीवनात उन्नती झाल्याशिवाय राहणारच नाही. त्यामुळे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या शिकवणीवर आपण वाटचाल करावी असे आवाहन ना. पंकजाताई मुंडे यांनी यावेळी केले.

**अहिल्यादेवींनी स्थापित केलेल्या शिवलिंगाची पूजा**

बेडाघाट येथे नर्मदा नदीच्या मध्यभागी असलेल्या मंदिरात अहिल्याबाईंनी स्थापित केलेल्या शिवलिंगाचे ना. पंकजाताईंनी पूजन केले.अहिल्यादेवी होळकर यांचे धार्मिक कार्य मोठे आहे. याचाच सार बेडाघाट इथेही दिसून आला. नर्मदा नदीच्या मध्यभागी असलेले हे शिवालय अहिल्यादेवीनीं स्थापन केलेले आहे. त्यांच्या धार्मिक बांधिलकीची साक्ष देणाऱ्या मंदिरात पूजन करून आत्मिक प्रसन्नता लाभली असं त्या म्हणाल्या.



# धारूर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त रक्तदान शिबिर संपन्न

धारूर । प्रतिनिधी

किल्लेधारूर येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन जयंती उत्सव समितीकडून करण्यात येते २९ मे गुरुवार रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ स्वरूप सिंह हजारी, माधव तात्या निर्मळ, अनिल शेळके, माजी नगरसेवक यशवंत गायके, तुकाराम शिनगारे, नगरसेवक चोखाराम गायसमुद्रे, महादेव शेळके सह इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये रक्तदान शिबिरास सुरुवात करण्यात आली.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी ३५ युवकांनी रक्तदान शिबिरामध्ये सहभाग घेत रक्तदान करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन केले. तसेच ३० मे रोजी वृक्षारोपण तर ३१ मे रोजी शहरातून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची भव्य मिरवणूक काढण्यात येणार असल्याचे जयंती उत्सव समितीकडून सांगण्यात आले. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी उत्सव समितीचे अध्यक्ष पांडुरंग गायके, संतोष गायके, विलास मैद, सुभाष गायके सह पदाधिकारी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले यावेळी मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.

# बीड शहरातील मुख्य रस्त्यावर लोकसहभागातून वृक्षलागवड

## डॉ.योगेश क्षीरसागर यांची माहिती; बीडमध्ये सामाजिक संघटनांसोबत नियोजनार्थ बैठक

बीड । प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार हे शहरात आल्यानंतर अधिकाधिक वृक्ष लागवड व्हावी, यासंदर्भात आग्रही असतात. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याशी प्राथमिक चर्चा झाली. पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर बीड शहरातील मुख्य रस्त्यावर लोकसहभागातून वृक्ष लागवड करण्यात येणार आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली आहे.

बीडमध्ये वृक्षलागवडीच्या नियोजनार्थ गुरुवारी (दि.२९) रोटरी क्लब ऑफ मीडटाऊन, आयएमए, पतंजली, क्रेडाई या संघटनांसोबत बैठक झाली. शहरातील मुख्य मार्गावर पहिल्या टप्प्यात एक मार्ग निवडून वृक्ष लागवड केली जाणार आहे. रस्त्यावरील दुभाजक, रस्त्याच्या बाजूला उपलब्ध जागेवर झाडे लावण्याचे नियोजन सुरू आहे. पहिल्या टप्प्यात शहरातील चऱ्हाटा फाटा ते शिवाजी महाराज चौकापर्यंत २० मीटर अंतरावर १ झाड लावण्याबाबत चर्चा झाली. या मोहिमेसाठी अधिकाधिक सामाजिक



संघटनांना सहभागी करू, तसेच वैयक्तिक पातळीवर योगदान देणार असल्याचेही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले. त्यांनी राष्ट्रीय महामार्ग विभागाचे उपअभियंता राजेंद्र भोपळे यांच्याकडून वृक्ष लागवडीसाठी रस्त्याचा एक आराखडा मागविला आहे. या आराखड्यातून वृक्ष लावल्यानंतर रस्ता रुंदीकरण, विद्युत खांबांना अडथळा होऊ नये म्हणून ते तोडण्याची वेळ येणार नाही, या बाबी स्पष्ट होतील. या बैठकीस आयएमएचे जिल्हाध्यक्ष डॉ.अनंत मुळे, सचिव डॉ.अमोल गीते, रोटरी क्लब ऑफ मीडटाऊनचे सदस्य संतोष पडोळे, लक्ष्मण मळेकर यांच्यासह नर्सरी चालक, वृक्षप्रेमी नागरिकांची उपस्थिती होती.



बीड : पोलीस बॉईज संघटना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष रवींद्र शिनगारे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना फहीम इनामदार, अजय वाघमारे, गणेश भेटे.

# बीड शहरात बीड नगर परिषदेने वृक्षारोपण करण्याची मोहीम हाती घेण्यात यावी : माजी नगरसेवक विष्णू वाघमारे

बीड । प्रतिनिधी



बीड नगरपरिषद नागरिकाकडून वृक्ष कर वसूल करते व त्यांचे नागरिकाकडून करायची भरणा केली जाते परंतु शहरामध्ये झाडाची संख्या कमी प्रमाणात दिसून येत असल्यामुळे बीड नगरपरिषद हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्याची झाडे लावा झाडे जगवा मोहीम हाती घेऊन बीड नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये राबविण्यात यावी यासंदर्भात बीड नगरपरिषद चे प्रशासक व मुख्याधिकारी यांना बीड माजी जेष्ठ नगरसेवक विष्णू (भैय्या) वाघमारे यांनी दिलेले निवेदन आहे.

# बाल संगोपन योजनेचा ११५ मुलांना लाभ; राजेश गवळी यांच्या प्रयत्नाला यश

पिंपळनेर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपळनेर व परिसरातील ११५ विद्यार्थ्यांना महिला व बालकल्याण विभागाच्या बालसंगोपन योजनेअंतर्गत ११५ मुलांना लाभ मिळवून देण्यात आला. यासाठी माजी पं.स. सदस्य राजेश गवळी यांनी प्रयत्न केले होते. त्यांच्या या प्रयत्नाला यश आले असून नुकताच एका कार्यक्रमात हा मंजुरी पत्राचे वाटप करण्यात आले.

पिंपळनेर आणि परिसरातील ज्या मुलांना आई किंवा वडील नाहीत अशा मुलांसाठी महिला व बालकल्याण विभागांतर्गत बालसंगोपन योजना कार्यान्वित आहे या योजनेतून अशा मुलांना आर्थिक लाभ मिळतो परंतु ही योजना अनेक स्थानिक नेत्यांना माहितीच नसल्याने या योजनेचा लाभ ग्रामीण भागातील मुलांना मिळत नाही परंतु संकल्प सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून माजी पं. स. सदस्य राजेश गवळी यांनी संबंधित पालकांना



भेटून विविध कागदपत्राची पूर्तता करून पिंपळनेर येथील ६७ व परिसरातील ४८ मुलांना या योजनेचा लाभ मिळवून दिला आहे. यासाठी अनेक दिवसापासून राजेश गवळी हे प्रयत्न करीत होते त्यांच्या या प्रयत्नाला नुकतेच यश मिळाले असून एका छोटेखानी कार्यक्रमात या मंजुरी पत्राचे वाटप करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला राजेश गवळी अशोक होळकर, प्रदीप आणेराव, भागवत कदम सह लाभार्थी मुले व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गरीबाचा नेता**

सध्याची राजकीय परिस्थिती पाहता स्थानिक किंवा वरिष्ठ स्तरावरील पुढारी व कार्यकर्ते वैयक्तिक लाभासाठी धडपड करत असतात मात्र २५ वर्षापासून स्थानिक पातळीवर राजेश गवळी यांनी गरिबीची जाणीव ठेवून अनेक गोरगरीब नागरिकांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून दिला. शेकडो वृद्ध ३४३, श्रावणबाळ ७४९, विधवा २४६, अनाथ मुले १४, बालसंगोपन बीड शहर १००, पिंपळनेर व परिसर ११५ तसेच विद्यार्थ्यांसाठी अहोरात्र परिश्रम घेत आहेत व शासकीय योजनेचा लाभ मिळवून देतात. त्यामुळेच गवळी यांना गरीबाचा नेता म्हणून ओळख निर्माण झाली आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा ३०० वा त्रिशताब्दी जयंती उत्सव सोहळ्याचे साक्षीदार व्हा : सारंग खरात

बीड । प्रतिनिधी



पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३१ मे रोजी ३०० वी जयंती चौंडी या ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे. या जयंतीनिमित्त चौंडी येथे उपस्थित राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री, लोकप्रतिनिधी आमदार हे उपस्थित राहणार आहेत. चौंडी या ठिकाणी होणाऱ्या जयंतीचा भव्य असा विश्वविक्रम घडविण्यात येणार आहे. यामुळे होणाऱ्या या जयंतीला राज्यातील सर्व समाज बांधवांनी खूप मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आव्हान सारंग खरात यांनी केले आहे.

## केज हद्दीत दरोडा टाकुन दहशत निर्माण करणाऱ्या अट्टल गुन्हेगारांच्या टोळीवर मोक्का कायदयाअंतर्गत कारवाई

# बीड जिल्ह्यातील पाचव्या गुन्हेगारांच्या टोळीवर मोक्का

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयातील कायदा आणि सुव्यवस्था अबादित राखण्यासाठी बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कौवत यांनी शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. बीड जिल्हयातील गुन्हेगारीचे व गुंडगिरीचे समूळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून चजजउ- व चझऊ- व कलम ५५,५६,५७ मपोका अन्वये बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचा धडाका बीड जिल्हाचे पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली बीड पोलीसांनी सुरु ठेवला आहे. जनतेच्या जिविताचे व मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी जिल्हयात चोऱ्या, दरोडे, घरफोड्या, खून, खुनाचा प्रयत्न, दरोड्याची तयारी, बलात्कार, जुलुमाने घेणे, पळवून नेणे, खंडणी मागणे या व अशा गंभीर स्वरुपाचे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांविरुध्द ठोस कारवाई करण्यासाठी बीड जिल्हयातील पोलीस जिल्हयातील व जिल्हाचे बाहेरील गुन्हेगारावर करडी नजर ठेऊन आहेत.

फिर्यादी नामे आकाश भास्कर जाधव वय २६ वर्षे व्यवसाय खाजगी नौकरी, वॉचमन अवादा कंपणी मस्साजोग रा. विडा ता. केज जि. बीड यांनी फिर्याद दिली की, दिनांक ०७/०४/२०२५ रोजी रोजी सायंकाळी ०७.०० वाजता मी सोचत अभिजीत दुनघव असे मौजे विडा शिवारात आवादा कंपनीने कामावर वॉचमन म्हणून काम करत असतांना रात्री, अंदाजे ११.४५ वाजेच्या सुमारास तेथे अनोळखी १४ लोक चालत आले त्यावेळेस मी व अभिनीत दुनघव यांनी त्या अनोळखी लोकांना तुमचे इकडे काय काम आहे? असे म्हणताच त्यातील चार लोक आमचे जवळ आले, त्यांच्या हातातील लाकडी दांडयाने आम्हांला मारहाण करुन जखमी केले. त्यातील चारपैको दोचे सडपातळ होते व दोघे जाड होते. त्यांनी बाजुला पडलेल्या सतरंजीच्या पट्टीने त्यातील दोन लोकांनी माझे व इतर दोन लोकांनी अभिजीत दुनघव यांचे हात पाय बांधले व इतर १० लोक हे आवादा कंपनीचे चालु असलेल्या पवनचक्कीच्या पाईप मधुन लोखंडी शिडीवर चढले व जबरदस्तीने खालील वर्णनाचा माल ।) रोटर केबल २,००,०००/-रु २) स्टार्टन केवल ८,११,०००/ रु ३) अथीग केबल २,७६,०००/- असे एकूण १२.८७,०००/- रु. चा माल चोरुन नेला आहे.



तरी दिनांक ०७/०४/२०२५ रोजीचे रात्री ११.४५ ते दिनांक ०८.०४.२०२५ चे ०४.०० वा. सु. यातील अनोळखी १४ चोरटयांनी मौजे विडा शिवारातील थ्व्ख्र४८ लोकेशन मधील पवनचक्कीचे काम सुरु असलेल्या ठिकाणी येवुन, मला व अभिजीत दुनघव वाला लाकडी दंडुक्याचा धाक दाखवुन आमचे हात-पाय बांधून लाकडीकाठीने माराहण करुन जखमी करुन वरील वर्णनाचा अंदाजे १२,८७,०००/-रुपयाचा चोरुन नेला म्हणून माझी त्यांचे विरुध्द तक्रार आहे. वगैरे मजकुरा वरुन पो.स्टे. केज गु.र.नं. १४५/२०२५ कालम ३१०(२) भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे सदर गुन्ह्याचे तपासात केज/स्थागुशा पोलीसांनी आरोपींचा बारकाईने शोध घेवुन सदर गुन्ह्यातील आरोपी नामे १. बबन सरदार शिंदे वय ४० वर्षे रा. नांदूरघाट ता. केज जि. बीड २. धनाजी रावजी काळे वय २३ वर्षे रा. लक्ष्मी पारधी वस्ती तेरखेडा ता. वाशी जि. धाराशिव ३. मोहन हरी काळे वय ३० वर्षे रा. सदर ४. लालासाहेब सखाराम पवार वय २६ वर्षे रा. दसमेगांव ता. वाशी जि. धाराशिव यांना दिनांक १४/०४/२०२५ रोजी अटक केली व त्याची झउठ पेऊन तपास केला आहे. तसेच गुन्हयांत इतर ०६ आरोपी निष्पन्न झाले असुन ते फरार आहेत पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. तपासा दरम्यान अटकेतील आरोपीतांकडून गुन्हयातील चोरलेला माल कॉपर वायर व बोलेरो गाडी असा एकुण ९,००,०००/- लक्ष रु चा माल जप्त केला आहे. सदर टोळी ने आज पावेतो संघटीतरीत्या बीड व धाराशिव जिल्हयातील पो. स्टे. केज, नेकनुर, ढोकी, वाशी हद्दीत एकुण ।। गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. ज्यात दरोडा टाकणे, जबरी चोरी करणे, घरफोडी करणे, गंभीर दुखापत करणे या सारखे गंभीरस्वरुपाचे गुन्हे केले आहेत. प्रस्तावात एकुण ११ गुन्हे विचारात घेण्यात आले. त्यापैकी ०९ गुन्हयांची दखल न्यायालयाने घेतलेली असुन १२ गुन्हा पोलीस तपासावर आहे. सर्व गुन्हे १० वर्षाच्या आतील असुन ०३ वर्षापेक्षा जास्त शिक्षेस पात्र आहेत. सदर टोळीचा टोळी प्रमुख याने स्वतःच्या व टोळीतील इतर सदस्यांच्या आचीक फायदयासाठी सदरचे गुन्हे केल्याचे पोलीस अधीक्षकांच्या चानाक्ष नजरेतून लपुन राहीले नाही, त्यावरुन बीड जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या सुचने वरुन सदर प्रकरणांत तपासी अधिकारी पोनि वैभव पाटील पो.स्टे. केज यांनी अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई व स.पोलीस अधिक्षक केज यांचे मार्गदर्शनाखाली सदर टोळी विरुध्द मोक्का कायद्या अंतर्गत प्रस्ताव तयार करुन दिनांक १३/०५/२०२५ रोजी पोलीस अधीक्षकांना सादर केला होता. पोलीस अधिक्षक, श्री नवनीत कौवत यांनी सदर प्रस्तावाचे अवलोकन करुन दिनांक २०/०५/२०२५ रोजी प्रस्ताव आपले शिफारशी सह मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र छत्रपती संभाजीनगर यांना सादर केला होता. मा. श्री. विरेंद्र मिश्र विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र छत्रपती संभाजीनगर यांनी सदर प्रस्तावाचे अवलोकन करुन दिनांक २९/०५/२०२५ रोजी नमूद संदर्भीय गुन्हयांत महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ मधील कलमांचा अंतर्भाव करण्याची परवानगी दिल्याने पोलीस अधीक्षक बीड यांनी सदर प्रकरणांचा पुढील तपास श्री. कमलेश मीणा, सहायक पोलीस अधीक्षक केज यांचेकडे दिला आहे व मोक्का कायदयाचे कलम ३(१)(ळळ),३(२),३(४) समाविष्ठ करणे बाबत आदेशीत केले आहे. त्यावरुन सहायक पोलीस अधीक्षक केज हे सदर गुन्हयांचा पुढील तपास करीत आहेत. सदर प्रकरणांत ०४ आरोपी अटक असुन ०६ आरोपी फरार आहेत. पोलीस त्यांच्या शोधात आहेत.

## रुई लिंबा येथे छ.शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान संपन्न

# भारतीय नागरिकत्वाचा पुरावा म्हणजे आधार आयडी तसेच शेतकरी असल्याचा पुरावा म्हणजे फार्मर आयडी : नायब तहसीलदार डोके



बीड । प्रतिनिधी

गुरुवार दि २९ मे रोजी मौजे रुई (लिंबा) येथे महाराष्ट्र शासनाच्या आदेशाने महसूल विभाग बीडचे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान यशस्वीरीत्या संपन्न झाले. सदर अभियानाचे उद्घाटन व प्रमुख मार्गदर्शन सुरेंद्र डोके नायब तहसीलदार बीड यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष दिनकर भोसकर, सरपंच होते. यावेळी प्रभू येवले (मंडळ अधिकारी, राजुरी (न.), नवनाथ तांदळे (तलाठी, मुर्शदपूर), संजय पाखरे तलाठी, राजुरी (न.), बंडू आगलावे (तलाठी, तळेगाव), उत्तरेश्वर खांडे (तलाठी, बेलुरा), प्रवीण सानप (तलाठी, वंजारवाडी), श्री गावडे, (कृषीसहायक) श्री तळेकर, (कृषीसहायक), अशोक सोळुंके उपसरपंच, इ. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते .

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीड जिल्ह्याचा पदभार घेतल्यापासून सर्वसामान्य जनतेची कामे करण्याचा विडा उचलला आहे. नव्यानेच रुजू झालेले अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांचे नेहमी सर्व महसूल अधिकारी यांना मार्गदर्शन असते. सर्वसामान्य शेतकऱ्यांची कामे वेळेवर झाली पाहिजे हा त्यांचा कटाक्ष असतो. बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव या सुद्धा सर्वसामान्य जनतेसाठी राबतांना दिसतात.

महसूल विभागाअंतर्गत ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता-शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे विविध कामकाजाचे निराकरण करणे बाबत या शिबिराचा उद्देश आहे. यामध्ये जिवंत सातबारा मोहीम (वारस फेरफार), सस्ती अदालत (रस्ते खुले करणे), विविध दाखले वितरित करणे (सेतू मार्फत), ग्रीस्टॅक (फार्मर आयडी), पुरवठा विभागाची कामे, संजय गांधी – श्रावण बाळ योजना डी बी टी कामे, ई-फेरफार, ई-केवायसी, इत्यादी कामे ग्रामस्तरावर प्रश्न मार्गी लावणे / निकाली काढणेच्या दृष्टीने कामकाज करण्यात आले. यामध्ये प्रातिनिधिक स्वरुपात ११ जिवंत सातबारा (वारस फेरफार), ८ जणांचे फार्मर आयडी, ५ जणांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र, १० जणांचे APL कार्ड, वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक श्री खाकरे यांनी व आभारप्रदर्शन अशोक अप्पा सोळुंके यांनी केले.

बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना शेतकऱ्यांच्या कामाविषयी अतिशय कनवाळूपणा आहे. तहसील कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक सर्वसामान्य व्यक्तीचे कसे समाधान होईल, यासाठी त्यांचा प्रयत्न असतो. तहसील कार्यालयातील सर्व नायब तहसीलदार, अधिनस्त मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी यांनी जनतेत जाऊन कामे केली पाहिजे, सर्वसामान्य कोणत्याही व्यक्तीचे काम न झाल्यास सरळ माझ्याशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

मागील काही दिवसापासून राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी लोकोपयोगी अनेक निर्णय घेतले आहेत. याशिवाय विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी सुद्धा सस्ती अदालत योजना विभागात चांगल्या प्रकारे राबविल्याचे दिसून येते. अशाच प्रकारे महसूल विभाग जनताभिमुख कामे करत राहिल्यास निश्चितच बळीराजा सुखी होईल यात शंका नाही.

# नाफेडची कांदा खरेदी तात्काळ सुरू करा : वैभव शिंदे

नेकनूर । प्रतिनिधी



गेल्या काही दिवसांपासून कांद्याचे दर सतत कोसळत आहेत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. कांदा लागवडीचा खर्चही सुटत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे कांदा खराब होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना हा कांदा विकल्याशिवाय पर्याय नाही. वाढती उष्णता आणि बदलत्या वातावरणाचा कांदा टिकवण क्षमतेवर परिणाम होत आहे. याचाही फटका शेतकऱ्यांना बसतो. आवक कमी होऊनही दरात कमालीची घसरण आहे. प्रतिकिलो सरासरी अवघा १० ते १२ रुपये दर मिळत आहे. त्यामुळे एकंदरीतच कुठलाही दिलासा कांदा उत्पादकांना शेतकऱ्यांना मिळत नसल्याची स्थिती आहे. त्यामुळे शेतकर्यांचे मोठे हाल होत आहेत.

बाजारभाव नसल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. कांदा लागवडीचा खर्चही निघत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. तातडीने कांद्याच्या भावात होणारी घसरण न थांबल्यास कांदा उत्पादक शेतकरी कर्जाच्या खाईत लोटले जातील. राज्य सरकारमार्फत कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तत्काळ 'नाफेड' मार्फत योग्य त्या किमतीत कांदा खरेदी सुरू करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. राज्यांत कांद्याचे मोठ्या प्रमाणात पीक आहे. याचा परिणाम भावावर होत असून दर घसरले आहेत. परिणामी शेतकऱ्यांना कांदा विक्री करताना फटका बसत असून कमी किमतीत विक्री करावे लागत आहे, शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी 'नाफेड' मार्फत तत्काळ कांदा खरेदी करण्यात यावी अशी मागणी वैभव शिंदे यांनी केली आहे.

# बकरी ईद च्या अनुषंगाने शांतता समितीची बैठक



बीड । प्रतिनिधी

आज बीड शहर पोलीस ठाण्यात बकरी ईद च्या अनुषंगाने शांतता समितीची मीटिंग ठेवण्यात आली होती. ह्या मीटिंगमध्ये बीड शहर ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री शितल कुमार बल्लाळ यांनी बकरी ईद च्या निमित्ताने शासनाच्या नियमावलीत राहुन बकरी ईद शांततेने साजरी करावे असे आवाहन केले.

मीटिंगमध्ये हिंदू मुस्लिम दोन्ही समाजाचे लोक उपस्थित होते. त्यामध्ये समाजसेवक मुसाखान पठाण, शिवसंग्राम चे बाळासाहेब घुमरे, अॅड. महेश धांडे, पत्रकार जावेद पाशा, अंकुश चव्हाण, अशोक कांबळे, नगरसेवक शेख इक्बाल, नगरसेवक आमेर अण्णा, राष्ट्रवादीचे वाजिद खान, सलीम अध्यक्ष, शाहेदखान शेख आमेर, मोहम्मद अलीबागे, इसा खान, झाहेद खादरी, श्री हनवते शेषेराव, तांबे, कामरान खान, साजन चौधरी व इतर शांतता कमिटीचे सर्व सदस्य उपस्थित होते.

# परळी तालुक्याला दोन वर्षानंतर मिळाला कृषी अधिकारी

## अर्चना नागरगोजे यांची ठाणे येथून परळीत बदली

परळी वैजनाथ । प्रतिनिधी



परळी तालुक्यातील कृषी अधिकाऱ्याची खुर्ची कायमस्वरूपी कृषी अधिकारी नसल्याने १० जुलै २०२३ पासून रिकामी होती. ठाणे येथून अर्चना नागरगोजे यांची परळी तालुका कृषी अधिकारी म्हणून बदली झाली असून दोन वर्षानंतर परळीला कृषी अधिकारी मिळाला आहे. परळी कृषी कार्यालयातील तालुका कृषी अधिकारी पद रिक्त असल्याने शेतकऱ्यांची अनेक कामे खोळंबली होती.

दोन वर्षे सोनवणे यांच्याकडे प्रभारी अधिकारी म्हणून पदभार होता. अर्चना नागरगोजे यांच्या रूपाने कायमस्वरूपी कृषी अधिकारी मिळाल्याने आता खरीप पूर्व नियोजन बैठका मार्गदर्शन मिळावे. शेतीशाळा बियाणे उगवण क्षमता चाचणी कार्यक्रम तसेच पोखरा योजनेच्या कामांना गती मिळणार आहे.

# अवकाळी पावसाचा बीड जिल्ह्यावर तडाखा

## नदी-नाले तुडुंब, शेतपिकांचे नुकसान; वंचितचे मिलिंद सरपते यांची मदतीची मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून सुरु असलेल्या अवकाळी पावसाने जनजीवन विस्कळीत केले आहे. सततच्या पावसामुळे नदी-नाले तुडुंब भरून वाहत असून अनेक भागांत पूरसदृश स्थिती निर्माण झाली आहे. परिणामी, शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून काही भागांत घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे संसारोपयोगी साहित्यही खराब झाले आहे.

गावपातळीवरील अंतर्गत रस्ते पाण्याखाली गेल्यामुळे नागरिकांच्या दैनंदिन हालचालीस अडथळा निर्माण झाला आहे. या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे बीड शहरातील कार्यकर्ते मिलिंद सरपते यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत पुढील मागण्या मांडल्या. शेतकऱ्यांच्या नुकसानीचा तात्काळ पंचनामा करून आर्थिक मदत जाहीर करावी. पूरग्रस्त भागांमध्ये आपत्कालीन सेवा तत्काळ उपलब्ध करून द्याव्यात. अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी पूर्वतयारी म्हणून उपाययोजना राबवाव्यात. मिलिंद सरपते यांनी निवेदनात नमूद केले की, नुकसानग्रस्त कुटुंबांवर मोठे संकट कोसळले असून शासनाने तत्काळ मदतीची पावले उचलावीत. दरम्यान, जिल्हा प्रशासनाकडून यासंदर्भात तातडीने कार्यवाही होण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# पोलीस निरीक्षक देवीदास वाघमोडे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उत्कृष्ट प्रशासक पुरस्कार जाहीर

धारूर । प्रतिनिधी

तालुक्यातील आसरडोह येथे मागील पंचवीस वर्षापासून राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी केली जाते. या वर्षी दि.२६ मे २०२५ सोमवार रोजी आसरडोह येथील जयंतीचा रौप्य महोत्सव व पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या त्रिशताब्धी जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे पदावरून बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस चे नेते प्रा.ईश्वर मुंडे म्हणाले की, लोकशाहीमध्ये जनतेने प्रमाणिक उमेदवाराला आपले बहुमूल्य मतदान देवून विजयी करणे हेच देश कार्य आहे. अधिकारी व पदाधिकारी प्रमाणिक असतील तर राष्ट्र माता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अपेक्षित सामान्य जनतेचा विकास वेगाने होईल. सद्य स्थितीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा



प्रशासकीय कार्याचा वारसा प्रभावीपणे चालवणाऱ्या अधिकाऱ्याला प्रती वर्षी आपल्या समितीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उत्कृष्ट प्रशासक पुरस्कार देण्यात यावा. यामुळे अधिकारी-कर्मचारी यांचे मनोबल वाढून त्यांच्या हातून जन हिताची कामे अधिक होतील.अशी संकल्पना मांडली.

या संकल्पनेला उपस्थितांनी टाळयाच्या कडकडाटात प्रतिसाद दिला व सन २०२५ चा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ऊत्कृष प्रशासक पुरस्कार धारूर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक श्री देवीदास वाघमोडे यांना सर्वानुमते जाहीर करण्यात आला. लवकरच त्यांना हा पुरस्कार मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे. कार्यक्रमास जेष्ठ नेते माऊली तात्या गडदे, सरपंच रविकिरण देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा व नवीन नौकरी लागलेल्या कर्मचाऱ्यांचा – हृदय सत्कार करण्यात आले.

आसरडोह येथील जन्मोत्सव कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रसिद्ध वक्ते महेश पिंगळे, अॅड.दत्तात्रय काजगुंडे, माऊली तात्या गडदे, गोविंद शिंदे, महेश बिट्टे, संदीप काजगुंडे, रंजित राठोड, गणेश पिंगळे, विष्णू शिंदे, संतोष काजगुंडे, आकाश शिंदे, उत्तम तरकसे, अंगद पिंगळे, विनायक गडदे, यशवंत धायगुडे, रमेश काजगुंडे, अनंत खडके, पांडुरंग काजगुंडे, बाबुराव देवकते, संतोष झारगड, प्रकाश काजगुंडे यांनी प्रयत्न केले.

# सिरसाळ्याच्या प्राथमिक आरोग्य केंद्राला घाणीचे साम्राज्य

सिरसाळा । प्रतिनिधी

सिरसाळा आरोग्यसाठी स्वच्छतेचे महत्व वैद्यकीय विभाग लोकांना सांगत असतं. पण इथे वैद्यकीय सेवा देणारी आस्थापनेलाच घाणीचे साम्राज्य दिसून येत आहे. ही परिस्थिती आहे. परळी तालुक्यातील सिरसाळा प्राथमिक सिरसाळाआरोग्य केंद्र आहे. मोठी इमारत आहे परंतु इमारतीच्या पुढील प्रमाणे मोकळ्या जागेमध्ये घाणच घाण दिसत आहे. बाजारपेठेतील कचराया ठिकाणी काही व्यावसायिक मंडळी काही नागरिक आणून टाकतात आहे. तर काहीजण प्राथमिक आरोग्य केंद्र प्रांगणाचा शोचासाठी मुतारी साठी उपयोग करतात यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्राला नुसत्या घाणीचे साम्राज्य नाही तर हागणदारीचे



स्वरूप देखील आले आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्राचे मुख्य प्रवेशद्वार खुले असल्याने याचा गैरफायदा काही व्यवसायिक नागरिक यांच्याकडून घेतला जात आहे. दुकान तसेच घरातील घरातील ओला कचरा या ठिकाणी टाकल्या जात असल्याने खूप दुर्गंधी या ठिकाणी पसरली आहे. रुग्णालयात रुग्णांना येताना नाकाला रुमाल. फडका. लावून यावे लागते आहे. काही नागरिक. व्यवसायिक या ठिकाणी कचरा टाकतात हे खरे असले तरी याला सिरसाळा प्रार्थमिक आरोग्य केंद्र आस्थापना देखील तेवढीच जबाबदार आहे.

या ठिकाणचे अधिकारी, कर्मचारी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या स्वच्छतेबाबत गंभीर नाहीत. कधीच स्वच्छता केली जात नाही. यामुळे हे ठिकाण घाणीचे साम्राज्य बनले आहे. नवीन इमारतीत दवाखाना सुरू आहे परंतु ह्या नवीन दवाखान्यासमोर जुनी इमारत तशीच आहे. या इमारतीत लोक हागत आहेत. मुतत आहेत आणि असशील गैरप्रकार करत आहेत. इमारत पाडणे प्रस्तावित असताना पाडली नाही आता यात गोरख धंदे चालतात. अशील प्रकारची ही इमारत अड्डा झाली आहे.

# सादेक इनामदार यांची भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड



धारूर । प्रतिनिधी

इंजिनीयर सादिक इनामदार हे धारूर शहरातील एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून मागे अनेक वर्षापासून त्यांनी काम केलं पद मिळालं असं नव्हे, तर हे संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी ठरणारं एक ऐतिहासिक पाऊल आहे. सर्व संकटावर मात करून त्यांना हे पद मिळालं हे त्यांनी केलेल्या मागील वीस वर्षाच्या कार्याबद्दल त्यांचं हे पद म्हणजे सन्मानच समजावा लागेल.

सादेक इनामदार हे नाव म्हणजे समाजासाठी वाहिलेलं एक प्रामाणिक नेतृत्व. त्यांनी सामाजिक क्षेत्रात अनेक वर्षं निस्वार्थपणे कार्य केलं आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख म्हणजे त्यांचा तगडा जनसंपर्क. गावपातळीपासून ते राष्ट्रीय स्तरापर्यंत त्यांचा संबंध असलेली माणसं ही केवळ संपर्कात नसतात, तर त्यांच्या मनात भैय्या साहेबांविषयी आदर असतो. प्रत्येक स्तरातील लोकांशी संवाद साधणं, त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर काम करणं ही त्यांची विशेषता आहे.

सादेक भैय्या इनामदार हे सर्व समाजासाठी एक सशक्त, विद्वान आणि दृष्टीकोन असलेले नेतृत्व आहेत. त्यांनी केवळ समाजासाठी वक्तृत्व केलं नाही, तर शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सामाजिक न्याय या मुद्द्यांवर अनेक उपक्रम राबवले. मुस्लिम समाजात एकजूट, शिस्त आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचं मोठं काम त्यांनी केलं आहे. आजच्या पिढीतील तरुणांसाठी सादेक भैय्या इनामदार हे एक रिअल हिरो आहेत. त्यांचं बोलणं आणि वागणं तरुणांच्या मनाला भिडतं. सोशल मिडियापासून ते प्रत्यक्ष मैफिलीपर्यंत तरुण त्यांच्यासोबत राहण्यासाठी उत्सुक असतात. त्यांनी नेहमीच तरुणांना प्रेरणा देणारी भूमिका बजावली असून, त्यांच्या मार्गदर्शनाने अनेक तरुण समाजकार्य आणि नेतृत्वाच्या प्रवासात उतरले आहेत.

बीड जिल्ह्यातील २०१९ चा लोकसभा विधानसभा खर्च घोटाळा असेल इनामी जमीन घोटाळा असेल ऑक्सिजन निर्मिती घोटाळा असेल व आत्ताचा शालेय शिक्षण भरती घोटाळा मिलिया शाळेची मान्यता रद्द संदर्भातला प्रकरण असेल असे अनेक भ्रष्टाचाराचे प्रकरण उघडकीस आणून संबंधित अधिकाऱ्यांना दोषी करून त्यांच्यावरती कारवाई करण्याचे काम सादेक भैय्या इनामदार यांचं खरं कौतुक यात आहे की, त्यांनी कधीही पदासाठी धाव घेतली नाही, पण त्यांची कामं, त्यांचा संयम, आणि त्यांची सच्ची समाजनिष्ठा यामुळेच पद त्यांच्या पाशी आलं. त्यांचं संपूर्ण जीवन हे एक आदर्श शिस्तबद्ध जीवन, प्रामाणिकता, आणि समाजसेवेसाठी समर्पित आहे.

आज जेव्हा ते भ्रष्टाचार निर्मूलन समितीसारख्या अत्यंत जबाबदारीच्या आणि महत्वाच्या संस्थेच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी विराजमान झाले आहेत, तेव्हा समाजाला आशा आहे की, ते प्रामाणिक व्यवस्था निर्माण करण्यासाठी, भ्रष्ट प्रवृत्तींचा नायनाट करण्यासाठी, आणि नव्या पिढीसाठी एक स्वच्छ, सक्षम भारत घडवण्यासाठी निर्णायक भूमिका निभावतील. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांना सर्व समाजातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे. पुढील वाटचालीसाठी असंख्य लोकांनी शुभेच्छा! त्यांच्या नेतृत्वाखाली भ्रष्टाचारविरोधी लढ्याला नवा जोम, नवी दिशा मिळेल, याची पूर्ण खात्री आहे. या निवडीबद्दल संपूर्ण महाराष्ट्र व महाराष्ट्र बाहेर त्यांच्या मित्र परिवाराच्या वतीने पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT